**दिव्यांगाकरिता शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस प्रशिक्षण व प्रोत्साहन शुल्क प्रतिपूर्ती तसेच फक्त दिव्यांगाकरिता असलेल्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील भौतिक सुविधा व यंत्रसामुग्री व साधनसामुग्री करिता एकवेळचे अनुदान देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : आयटीआय २०१९/प्र.क्र ५७/ व्यशि -३**

मंत्रालय, दुसरा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २० सप्टेंबर, २०१९

**संदर्भ** : १) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, संकीर्ण -३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दिनांक १४, मे, २०१५.

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचे पत्र क्रमांक ०८/खाऔप्रसं/अनुदान प्रस्ताव/२०१९/२५, दिनांक १५ जून, २०१९

**प्रस्तावना :-**

राज्याच्या औद्यौगिकीकरणात झपाट्याने वाढ होत आहे. त्या अनुषंगाने आधुनिक तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची गरज लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांना निर्माण झाली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणातून कारखान्यासाठी तंत्रज्ञानाच्या गरजेशी सुसंगत व कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण होत आहे. शिल्प कारागिर प्रशिक्षण योजना शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून देखिल प्रशिक्षण योजना राज्यात राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून रोजगार संधी उपलब्ध करून देण्यात येत असून, त्यांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञानही देण्यात येत आहे. सद्य:स्थितीत राज्यातील प्रत्येक तालुक्यात किमान एक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. तसेच कायम विनाअनुदान तत्वावर खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून शिल्पकारागिर प्रशिक्षण योजनेअंतर्गत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जात आहे.

१.२. सद्य:स्थितीत राज्यात ४१७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ५६४ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अशा एकूण ९८१ संस्था कार्यरत आहेत. या संस्थांची प्रवेश क्षमता (Seating Capacity) २,१२,४६४ प्रशिक्षणार्थी इतकी असून, प्रति वर्षी सरासरी १,४१,७९६ इतक्या जागा प्रत्यक्ष प्रवेशासाठी उपलब्ध होतात. डी.जी.टी., नवी दिल्ली यांच्या निदेशानुसार राज्यातील विद्यमान शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून प्रवेशासाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या ४ टक्के जागा दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात येत आहेत. तथापि, राज्यात दिव्यांगांकरिता स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था अस्तित्वात नाहीत. राज्यातील दिव्यांगांची मोठया प्रमाणात असलेली संख्या

विचारात घेता त्यांच्याकरिता त्या प्रमाणात व्यवसाय प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना दिव्यांगाकरिता व्यवसाय प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

१.३. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांकरिता केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांला त्याच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नानुसार प्रशिक्षण शुल्काच्या १००% किंवा ८०% रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येत आहे. तथापि, दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांला व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यासाठी अधिकच्या पायाभूत सुविधा जसे की, Ramps, Lift इत्यादीं आवश्यक असतात. तसेच प्रशिक्षणार्थ्यांच्या counselling करिता प्रशिक्षित विशेष शिक्षकांची आवश्यकता असते. त्यामुळे खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था दिव्यांगाना व्यवसाय प्रशिक्षण देण्यास इच्छुक नसतात. दिव्यांगाना व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीच्या व्यतिरिक्त निश्चित दराने प्रोत्साहनात्मक रक्कम देणे क्रमप्राप्त आहे. त्याचप्रमाणे फक्त दिव्यांगाकरिता स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याच्या दृष्टीने खाजगी संस्थांना प्रोत्साहित करण्यासाठी भौतिक सुविधा, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीकरिता एक वेळचे अनुदान देणे आवश्यक आहे. दिव्यांगांकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, प्रोत्साहनात्मक रक्कम व एकवेळचे अनुदानाबाबतच्या योजनेस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या दिनांक ०९.०९.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार दिलेल्या मान्यतेनुसार दिव्यांगाकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस अनुदान देण्याबाबतच्या योजनेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेने (SCVT) मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकडयांमधील प्रवेशासाठी उपलब्ध जागांवर केंद्रीय ऑन लाईन पध्दतीने प्रवेश घेतलेल्या दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांकरिता शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्काच्या १००% या दराने प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यांस तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अनुज्ञेय असलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक १४ मे, २०१५ मधील तरतूदीनुसार निश्चित करण्यात आलेल्या प्रशिक्षण शुल्काच्या २०% प्रोत्साहनात्मक रक्कम शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अदा करण्यांस, मान्यता देण्यांत येत आहे.

यात्व्यतिरिक्त फक्त दिव्यांगाकरिता सुरू करण्यात येणाऱ्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस यंत्रयामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडयांकरिता रूपये १.०० कोटी रकमेच्या मर्यादेत एक वेळचे अनुदान देण्यास या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

**१. प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा तसेच प्रोत्साहनात्मक रकमेचा लाभ खालील अटीं व शर्तींची पुर्तता करणाऱ्या दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांना अनुज्ञेय राहील :-**

(१) दिव्यांगासंदर्भातील Rights of Persons with Disabilities Act, २०१६ तसेच अनुषंगिक मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदीनुसार दिव्यांग विद्यार्थी हे खाजगी/शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशित असावेत.

(२) दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांने यापूर्वी खाजगी व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला नसावा. तसेच राज्य / केंद्र शासनाच्या विभागाने अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण, कंपन्या, महामंडळे यांनी पुरस्कृत केलेल्या ०६ महिनेपेक्षा अधिक कालावधीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला नसावा.

(३) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

(४) सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार प्रशिक्षणार्थ्याची प्रशिक्षण वर्गातील उपस्थिती ही DGT, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या निकषानुसार असणे आवश्यक राहील.

(५) अर्जदार विद्यार्थ्यांस प्रत्येक सत्र परिक्षा अथवा वर्षाची परिक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परिक्षा देणे शक्य झाले नसल्यास, विद्यार्थी व सबंधित संस्थेने शिफारस केल्यानंतर सहसंचालक, प्रादेशिक विभाग यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

(६) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षण हे प्रात्यक्षिकाभिमुख असल्यामुळे दिव्यांग प्रशिक्षणार्थ्याने संबंधित व्यवसायातील प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी दिव्यांगामुळे कोणतीही अडचण येणार नाही याबाबत पात्रता प्रमाणपत्र सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

२. या योजनेंतर्गत पात्र दिव्यांग विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर रहाणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांने निर्दशनास आणले तर अशा विद्यार्थ्यांकरिता संस्थेला शुल्क प्रतिपूर्ती व प्रोत्साहनात्मक रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

३. या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांने प्रशिक्षण मध्येच सोडले तर अशा विद्यार्थ्याकरिता संस्थेला अदा करण्यात आलेली प्रशिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीची व प्रोत्साहनात्मक रक्कम शासनास वाटल्यास वसूल करण्यात येईल.

४. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती बायोमॅट्रीक प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील. सदर बायोमॅट्रीक प्रणाली स्वखर्चाने खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

५. प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची तसेच प्रोत्साहनात्मक रक्कम संबंधित संस्थेच्या बँक खात्यामध्ये आपले सरकार महाडिबीटी पोर्टलमार्फत जमा करण्यात येईल. दिव्यांग प्रशिक्षणार्थ्याकडून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस प्रशिक्षण शुल्क घेता येणार नाही.

६. सर्व सामाजिक प्रवर्गातील दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा राहणार नाही.

७. दिव्यांग प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्याकरीता दिव्यांग विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेवून प्रतिवर्ष रु. १.११ कोटी इतका अतिरिक्त निधी सन २०१९-२० या वर्षापासून मंजूर करण्यांत येत आहे.

**८. केवळ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करणाऱ्या संस्थांनी खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील:-**

१) संस्थेच्या मालकीची डिजीटी, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी विहित केलेल्या मानकानुसार दिव्यांगाकरिता अडथळा विरहित सुसज्ज इमारत असणे आवश्यक राहील.

२) संस्था नोंदणी कायदा, १८६० किंवा कंपनी कायदा, १९५६ किंवा Maharashtra Public Trust Act,१९५० अंतर्गत नोंदणी असणे आवश्यक राहील.

३) दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी अपंग कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सदर संस्थेची नोंदणी करणे आवश्यक राहील.

९. केवळ दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता सुरू असलेल्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भौतिक सुविधा, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी एकवेळचे अनुदान रूपये १.०० कोटी रकमेच्या मर्यादेत खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील :-

| अ. क्र. | व्यवसाय अभ्यासक्रमांचे वर्गीकरण | अनुदान (लाखात) प्रति व्यवसाय अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रम | |
| | मशिन गट | २०.०० |
| | बिगर मशीन गट | १५.०० |
| २ | बिगर अभियांत्रिकी व्यवसाय | ५.०० |

सदर अनुदान हे फक्त दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता चालविण्यात येणाऱ्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांची गरज विचारात घेवून निश्चित केले जाईल. या संदर्भातील प्रस्ताव संबंधित संस्थांनी शासनाकडे सादर करणे आवश्यक राहील.

९.१. शासनाकडून यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीकरिता एक वेळचे अनुदान प्राप्त झाल्यावर सहा महिन्याच्या कालावधीमध्ये व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीस डिजीटी, नवी दिल्ली अथवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

९.२. संस्थेस शासनाने विहित केलेल्या केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश देणे बंधनकारक राहील. संस्थेस मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांसाठी फक्त दिव्यांग उमेदवारास प्रवेश देण्यात येईल.

९.३. संस्थेस मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीस प्रवेश क्षमतेपेक्षा सलग दोन शैक्षणिक वर्षामध्ये ७५% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर तुकडीस शासनाची मान्यता रद्द करण्यात येईल. शासनास आवश्यक वाटल्यास यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीकरिता देण्यात आलेल्या एक वेळच्या अनुदानाची वसुली करण्यात येईल.

९.४. भविष्यात सदरचे अभ्यासक्रमांमध्ये डिजी.टी., नवी दिल्ली/राज्य शासन यांनी केलेला बदल केल्यास अथवा बंद करण्याबाबतचा निर्णय घेतल्यास, सदर निर्णय विनाअट, विनाविलंब अंमलात आणणे संस्थेस बंधनकारक राहील.

९.५. यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीकरिता संस्थेस अनुज्ञेय असलेल्या अनुदानाच्या मर्यादेत यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीची खरेदी देयके संबंधित संस्थेने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना पाठवावीत. खरेदी संदर्भात उद्योग विभाग तसेच शासनाने विहित केलेल्या धोरणांप्रमणे असावी. खरेदी देयकांमधील यंत्रसामुग्री व साधनसामुग्री यांचे Specification डिजीटी, नवी दिल्ली यांच्या विहित मानकानुसार असल्याबाबत प्रत्यक्ष पडताळणी करून तसेच देयकातील सामुग्रीचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याबाबतची पडताळणी करून संस्थेस यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादारास परस्पर देयकाची रक्कम निधी उपलब्धतेच्या प्रमाणात ऑनलाईन पध्दतीने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या मार्फत अदा करण्यात येईल. खरेदी करण्यात

आलेल्या यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीचा मालकीहक्क संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्याकडे राहील.

१०. सदर योजनेमध्ये व त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास रहातील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यांस व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस अथवा विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या विरूध्द करता येणार नाही.

११. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. या अनुषंगिक सर्व आवश्यक सुचना त्यांच्या स्तरावरून देण्यात याव्यात.

१२. सदर योजनेकरीता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने निधीची तरतूद व खर्च करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पात स्वंतत्र उप लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक वित्त विभागाच्या व महालेखापालांच्या मान्यतेने उघडण्यात येईल. तसेच सदर योजनेकरीता आवश्यकतेनुसार निधीची मागणी करण्याची जबाबदारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची राहील.

१३. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ०९/०९/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाचे अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१९१८२०४३९१०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Suvarna Siddharth Kharat
Date: 2019.09.21 16:47:43 +05'30'

**( डॉ. सुवर्णा खरात )**
सह सचिव,महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई
८. मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक
११. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/नागपूर
१३. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)
१४. प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (सर्व)
१५. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१६. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१७. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१८. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१९. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
२०. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
२१. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)

**प्रत,**

१. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहाय्यक
६. सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई,
७. निवड नस्ती. (व्यशि-३)